मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in

E mail - dainikyuvakaadhar@gmail.com

facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

युवक आधार

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १६४ ■ शनिवार, २१ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

सामाजिक न्याय विभागाचे 98 कोटी पुन्हा लाडकी बहीण योजनेसाठी वळवले

मुंबई - महायुतीला राज्यात पुन्हा सत्तेवर आणण्यात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेची भूमिका निर्णायक ठरली होती. आता या योजनेच्या जानेवारी 2026 च्या हप्त्याकडे राज्यभरातील लाखो महिलांचे लक्ष लागले आहे. दरमहा मिळणाऱ्या ₹1500 च्या अनुदानाचा जानेवारी महिन्याचा हप्ता येत्या काही दिवसांत खात्यात जमा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महिला व बालविकास विभागानं हप्त्याटप्प्यासाठी निधीची हालचाल सुरू केली असून, सामाजिक न्याय विभागाकडून 98.45 कोटींचा निधी वर्ग करण्यात आला आहे. यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. यापूर्वीही या योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाने निधी वर्ग केला होता.

यापूर्वीही सामाजिक न्याय विभागाचा निधी लाडकी बहीण योजनेसाठी वळवण्यात

आला होता. लाडकी बहीण ही योजना जरी लोकप्रिय ठरली असली तरी सरकारला त्याच्या निधीसाठी पैशांची प्रचंड जुळवाजुळव करावी लागत असल्याचं याआधी स्पष्ट झालं आहे. आदिवासी विकास आणि सामाजिक न्याय विभागाचा निधी महिला आणि बालविकास विभागाकडे सातत्याने वळवण्यात येत असल्याचं विसून येतं.

लाडकी बहीण योजना जुलै 2024 मध्ये योजना सुरू झाली तेव्हा लाभार्थींची संख्या 2 कोटी 46 लाख होती, त्यापैकी केवळ 1 कोटी 90 लाख महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली. म्हणजेच सुमारे 55 लाख महिलांनी ई-केवायसी न केल्यानं त्या वितरणातून वगळल्या गेल्या. डिसेंबर महिन्याचा हप्ता 1 कोटी 60 लाख महिलांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे.

नोव्हेंबर 2025 चा हप्ता डिसेंबरअखेर आणि जानेवारी 2026 च्या सुरुवातीला वितरित करण्यात आला होता, तर डिसेंबर महिन्याची रक्कम 14 जानेवारीदरम्यान लाभार्थींच्या खात्यात जमा झाली होती. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा ₹1500 दिले जातात. मात्र 'पीएम किसान सन्मान निधी' आणि 'नमो शेतकरी महासन्मान निधी'चा लाभ घेणाऱ्या महिलांना 'लाडकी बहीण' योजनेतून दरमहा ₹500 इतकीच रक्कम मिळते. दरम्यान, लाभार्थींच्या संख्येत घट झाल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होते. ई-केवायसी दुरुस्तीसाठी 31 मार्च 2026 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, पात्र महिलांनी ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. योजनेचे सातत्य राखताना लाभार्थ्यांची पडताळणी आणि निधी व्यवस्थापन हा सरकारपुढील महत्त्वाचा ताळमेळाचा प्रश्न ठरत आहे.

36000 कोटींही कमी पडले? - 2025-26 च्या अर्थसंकल्पात 'लाडकी बहीण' योजनेसाठी आधीच 36,000 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. एकूण 7.20 लाख कोटींच्या अर्थसंकल्पाच्या सुमारे 5 टक्के इतकी ही रक्कम आहे. त्यातच आता इतर विभागांच्या निधीतून अतिरिक्त निधी वळवला जात आहे.

याआधी राज्य सरकारकडून सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागांच्या निधीतून तब्बल 746 कोटींची तरतूद 'लाडकी बहीण' योजनेकडे वळवण्यात आले होते. या निर्णयामुळे राज्याच्या अर्थकारणावर या योजनेचा वाढता ताण पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

सामाजिक न्याय विभागाच्या 3,960 कोटींच्या तरतुदीतून 410.30 कोटी, तर आदिवासी विकास विभागाच्या 3,240 कोटींपैकी 335.70 कोटी 'लाडकी बहीण' योजनेसाठी देण्यात आले. सरकारने या निधीचा उपयोग अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातील लाभार्थी महिलांसाठीच केला जाईल, असा दावा केला जात असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.निधी वळवण्यावरून मंत्र्यांची नाराजी विधानसभा निवडणुकीपूर्वी जाहीर झालेल्या या योजनेस सुरुवातीला 46,000 कोटींची तरतूद करण्यात आली होती. महायुतीच्या सत्तेतील पुनरागमनात या योजनेची भूमिका महत्त्वाची मानली जात. मात्र त्यानंतर या योजनेचा आर्थिक बोजा आणि तिजोरीवरील ताण हेच राज्यातील राजकारणाचे प्रमुख मुद्दे ठरले आहेत. मागच्या अर्थसंकल्पात या योजनेची तरतूद ₹36,000 कोटींवर आणत सरकारने आर्थिक शिस्त राखल्याचा दावा केला होता. मात्र सतत निधी वळवणीमुळे त्या दाव्याकर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. महायुतीतील काही मंत्र्यांनीही या योजनेमुळे इतर विभागांवर गंडांतर येत असल्याची तक्रार यापूर्वीच केली होती.आताच्या निधी वळवण्यात आल्याच्या शासननिर्णयाबाबत सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी बोलताना म्हटले, "मागचे काही महिने सातत्याने सामाजिक न्याय विभागाच्या निधीतील रक्कम लाडकी बहीण योजनेसाठी दिली जात आहे. याआधीही मी याबाबत नाराजी व्यक्त केली होती. पण त्यानंतरही सरकारची हीच भूमिका आहे, त्यावर मी काय बोलणार!' असा प्रश्न शिरसाट यांनी उपस्थित केला आहे. या वादातून 'लाडकी बहीण' योजनेच्या सातत्याचा प्रश्न आणि राज्याच्या अर्थकारणावर वाढता भार पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांना महावितरणचे अभिवादन

दैनिक युवक आधार

सतीश कडू संपादक/नागपूर विभाग : मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त महावितरण कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले.महावितरनच्या काटोल मार्गावरील विद्युत भवन या मुख्यालयात कार्यकारी अभियंता अजित जिचकार यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. यावेळी सहायक मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) सुधीर टेकाम, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, प्रणाली विश्लेषक प्रविण काटोले यांचेसह अधिकारी व कर्मचा-यांनी देखील आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन केले.

माझी वसुंधरा अभियानातील स्पर्धेचा शनिवार २१ रोजी मुंबईत पुरस्कार वितरण सोहळा – मंत्री पंकजा मुंडे

मुंबई : पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ शनिवार, २१ फेब्रुवारी, २०२६ रोजी डोम वरळी, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन विभागाचा मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली आहे.

पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी राज्य शासनाने राबविलेल्या 'माझी वसुंधरा'अभियानाने राज्यात व्यापक जनसहभागातून उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत राबविण्यात येणारा हा पहिलाच एकात्मिक आणि अभिनव उपक्रम असून २ ऑक्टोबर २०२० पासून तो मिशन मोड पद्धतीने सुरू आहे.

पर्यावरण क्षेत्रात पदाधिकाऱ्यांना काम करण्यास प्रोत्साहन मिळावे यासाठी 'माझी वसुंधरा अभियान ४.०' व 'माझी वसुंधरा अभियान ५.०' चा पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे, हा सन्मान सोहळा २१ फेब्रुवारी, २०२६ रोजी डोम वरळी, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आला आहे. राज्यपाल आचार्य देवव्रत व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव होणार आहे.

पर्यावरण क्षेत्रात पदाधिकाऱ्यांना अधिक प्रोत्साहन मिळावे आणि स्थानिक स्तरावर पर्यावरण चळवळ अधिक बळकट व्हावी, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे मंत्री मुंडे यांनी स्पष्ट केले.

'माझी वसुंधरा अभियानांतर्गत' नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व ग्राम पंचायती या स्थानिक संस्थामार्फत पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या योजना प्रभावीपणे व मिशन मोड पद्धतीने राबविण्यासाठी दरवर्षी स्पर्धा घेतात व उत्कृष्टतम कामगिरी (विजेत्या) करणाऱ्या स्थानिक संस्थांना रोख रकमेचे बक्षिस देऊन गौरव करतात, माझी वसुंधरा अभियानामध्ये राज्यातील सर्व ४१८ नागरी स्थानिक संस्था आणि २७,८९९ ग्रामपंचायती या अभियानात सहभागी झाल्या आहेत.

गेल्या चार वर्षांत अभियानाअंतर्गत २९३.२७ लाख वृक्षलागवड करण्यात आली, ५२,४९७ हरित क्षेत्रांची निर्मिती व जतन करण्यात आले. राज्यात ३.९२ लाखांहून अधिक विद्युत वाहने वापरात आली आहेत, तसेच २८,०३५ पेक्षा अधिक पावसाचे पाणी झिरपविणारे शोषखड्डे तयार करण्यात आले असून त्यामुळे २२७.६० कोटी घनमीटर जलसंधारण क्षमता निर्माण झाली आहे, याशिवाय २,५०० हून अधिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यात आले आहे.

प्रभाग ०४ मध्ये 'लाडकी बहीण' ई-केवायसीला नगरसेवकांचा पुढाकार

दैनिक युवक आधार

नांदेड प्रतिनिधी /विश्वदीप कांबळे : प्रभाग क्रमांक ०४ मध्ये 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत ई-केवायसी प्रक्रिया सुरू असताना अनेक लाभार्थींना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर नगरसेवक बाळू पांचाळ यांनी पुढाकार घेत सर्व नाकारण्यात आलेल्या (रिजेक्ट) अर्जांची तपासणी करून



संबंधित महिलांना मार्गदर्शन केले. ई-केवायसीदरम्यान कागदपत्रांतील त्रुटी, तांत्रिक अडचणी व माहितीअभावी अनेक अर्ज नाकारले गेले होते. या सर्व प्रकरणांमध्ये नगरसेवक पांचाळ यांनी वैयक्तिक लक्ष देत अडचणी समजावून घेतल्या, आवश्यक दुरुस्त्या करून पुन्हा अर्ज प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी मदत केली. त्यामुळे लाभार्थींमध्ये समाधान व्यक्त होत असून योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.या उपक्रमामुळे महिलांना वेळेत व योग्य माहिती मिळाल्याने 'लाडकी बहीण' योजनेचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थींना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान आयोजित शिवजयंती सोहळा उत्साहात साजरा

दैनिक युवक आधार

सेलू/ प्रतिनिधी शिवाजी पवार : शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान यांच्या वतीने सेलू येथे सार्वजनिक शिवजयंती सोहळा मोठ्या उत्साहात आणि उत्स्फूर्त अश्या वातावरणात साजरा करण्यात आला, शहरातील विविध भागांतून शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून सोहळ्याला दणदणीत प्रतिसाद दिला,

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण अघोरी पथकाचे धारक सादरीकरण ठरले. त्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. तसेच महिला व मुलींच्या लेझीम पथकाने पारंपरिक वेशभूषेत सादर केलेल्या तालबद्ध खेळाने वातावरण दणाणून गेले. शिवभक्तांनी या सादरीकरणांना उत्स्फूर्त दाद दिली.

संपूर्ण परिसर 'छत्रपती शिवाजी महाराज

की जय'च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. कार्यक्रमाचा समारोप शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आणि आरतीने करण्यात आला, त्यानंतर भव्य अशा फटाक्यांच्या आतिषबाजीने सोहळ्याची सांगता झाली.या शिवजयंती उत्सवामुळे सेलू शहरात उत्साहाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले होते. आयोजकांनी कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.